# बाबा मुक्तानंदांच्या समयातीत शिकवणी

“एकदा का तुम्हाला तुमची खरी योग्यता कळली की,
तुम्हाला इतरांची योग्यता समजते.”

~ बाबा मुक्तानंद

मार्क मॅक्लॉग्लिन यांच्याद्वारे लिखित भाष्य

अंतर्मुखी ध्यानाच्या प्रत्यक्ष अनुभूतीद्वारे तुम्ही जेव्हा स्वतःला जाणून घेता, तेव्हा तुम्हाला हे ज्ञात होते की, समस्त सृष्टीचा आधार असलेली शक्ती म्हणजेच परमात्मा तुमच्याच आत्मस्वरूपात तुमच्या अंतरी वास करतो आहे. इतकेच नव्हे तर, अद्वैत वेदान्ताचे ऋषिगण तसेच अद्वैत शैवमताचे सिद्धजनदेखील आपल्याला सांगतात की, आत्म्याचे खरे सारतत्त्व प्रत्येकामध्ये एकच असते. स्वतःच्या आत्मस्वरूपाला जाणल्याने तुम्हाला इतर सर्वांच्या आत्मस्वरूपाचे ज्ञान होते. सोन्यापासून बनवलेल्या सर्व वस्तूंमध्ये ज्याप्रमाणे सोनेच व्याप्त असते, त्याचप्रमाणे सर्व प्राण्यांचे खरे सार म्हणून आत्माच त्यांच्यात व्याप्त असतो. तेव्हा, जसे की बाबा मुक्तानंद समजावून सांगतात की, अंतरी विद्यमान असलेल्या अविनाशी आत्म्याची प्रत्यक्ष अनुभूती जेव्हा तुम्हाला होईल आणि तुम्ही त्याचे अतुलनीय मूल्य जेव्हा ओळखाल, तेव्हा तुम्ही हे जाणाल की, इतर सर्वांची योग्यता ही तुमच्याप्रमाणेच अनंत व सर्वथा अमाप आहे.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.